(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**<u>प्रसिद्ध करण्यायोग्य</u>**

**मुंबई येथील उच्च न्यायालयात**

**फौजदारी अपील अधिकारक्षेत्र**

**फौजदारी अर्ज क्रमांक 881 / 2022**

श्री. इजहार निझामुलहक खान,

वय 59 वर्षे, व्यवसाय- नोकरी,

राहणार - घर क्रमांक 1595, रेवा आगर रोड,

मीरा-भाईंदर (पश्चिम), जिल्हा- ठाणे ... अर्जदार

विरुद्ध

1. महाराष्ट्र राज्य,

कार्यालयाच्या माध्यमातून

शिकलेले सरकारी वकील,

मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.

2. तपास अधिकारी, मीरा-भाईंदर पोलीस स्टेशन,

मीरा-भाईंदर (पश्चिम), जिल्हा-ठाणे. ... उत्तरवादी (अनेक)

...................

अर्जदारासाठी डॉ. दशरथ एस. हातले.

उत्तरवादी - राज्यासाठी अतिरिक्त सरकारी वकील श्री. एस. व्ही. गावंड,

श्री. किशोर माने, सहाय्यक पोलीस निरीक्षक, भायंदर पोलीस ठाणे

...................

**न्यायमंच : न्यायमूर्ति रवींद्र व्ही. घुगे आणि न्यायमूर्ति राजेश एस. पाटील**

**दिनांक : 6 जानेवारी, 2025**

**न्यायनिर्णय :- (न्यायमूर्ति रवींद्र व्ही. घुगे द्वारे)**

1. अर्जदार आरोपीने प्रार्थना खण्ड (ए) पुढीलप्रमाणे मांडले आहे :-

"*(ए) या माननीय न्यायालयाद्वारे विद्वान न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालय, ठाणे (मीरा-भाईंदर) यांच्याकडून आरसीसी क्र. 1528/2022 मधील अभिलेख आणि कामकाजाची लेखी नोंद बोलवण्यात यावी आणि पोलिस स्टेशन भाईंदर यांनी भादंवि च्या कलम 304 ए च्या तरतुदीनुसार दाखल केलेल्या वादग्रस्त एफआयआर क्रमांक 0047/ सीआर क्रमांक 41, दिनांक 02/02/2022 ची अचूकता, वैधता आणि औचित्यतेचे अवलोकन केल्यानंतर तो रद्द करून बाजूला ठेवण्यात यावे आणि प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात यावे*".

2. आम्ही अर्जदाराची बाजू मांडणारे विद्वान अधिवक्ता आणि विद्वान अतिरिक्त सरकारी वकील यांच्या काटेकोर निवेदनांचे विचार केले आहे.

3. आमच्यासमोर उपस्थित अर्जदार मेसर्स श्री शक्ती वेल्डटेक प्रायव्हेट लिमिटेडचा कारखाना व्यवस्थापक आहे. ही कंपनी भारतीय कंपनी अधिनियम, 1956 (1956 चा अधिनियम) च्या तरतुदींनुसार पंजीकृत कंपनी आहे. सदर कारखाना महाराष्ट्र कारखाना नियमावली, 1963 (थोडक्यात, '1963 च्या कारखाना नियमावली') च्या नियम 6 अंतर्गत पंजीकृत होता आणि त्याला कारखाना लायसन देण्यात आला होता. दिनांक 1 जानेवारी 2021 ते 31 डिसेंबर 2022 या कालावधीसाठी सदर लायसनचे नूतनीकरण करण्यात आले होते.

4. अर्जदाराला कारखाना नियमावली, 1963 मधील नियम 2(एम) च्या अर्थानुसार कारखाना व्यवस्थापक म्हणून नियुक्त करण्यात आले होते. दिनांक 31 मे 2021 रोजी, दुपारी 3.50 च्या सुमारास कारखान्याच्या आवारात एक अपघात झाला. कारखान्याच्या आवारात काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांपैकी एक श्री इलियास अब्दुल जब्बार सय्यदचा अपघात झाला आणि या अपघातात झालेल्या जखमांमुळे त्याचा मृत्यू झाला. हा औद्योगिक अपघात नव्हता, म्हणजे उत्पादन प्रक्रियेदरम्यान झालेल्या अपघातामुळे मृत्यू झाला नव्हता, ही एक मान्य स्थिती आहे.

5. दिनांक 2 जून 2021 रोजी, अपघाताचा अहवाल फॉर्म क्रमांक 24 मध्ये कारखाना निरीक्षकाकडे सादर करण्यात आला. दिनांक 3 जून 2021 रोजी पोलीस स्टेशन विनोबा भावे नगर, मुंबई येथील वरिष्ठ निरीक्षक यांनी श्री. इलियास अब्दुल जब्बार सय्यद (यापुढे मृतक म्हणून संबोधित केले जाईल) च्या मृत्यूसंबंधी फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 ('सीआरपीसी') च्या कलम 174 अंतर्गत अपघाती मृत्यू क्रमांक 00/ 2021 असलेली सर्व कागदपत्रे, संदर्भ क्रमांक 3532/2021 असलेल्या पत्रान्वये, पोलीस स्टेशन भाईंदरकडे हस्तांतरित केली. पत्र मिळाल्यानंतर हवालदार राजेश यशवंत केणी यांनी कारखान्याच्या मालकाला बोलावून दिनांक 31 मे 2021 रोजीचे कर्मचाऱ्यांचे हजेरी पत्रक, कारखाना लायसन तसेच कारखाना व्यवस्थापकाबद्दलचे घोषणापत्र यासारखी कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश दिले. कारखाना निरीक्षकाने दिनांक 2 जुलै 2021 रोजी कारखाना परिसराला भेट दिली आणि मालकाला निरीक्षण अभिप्राय दिला.

6. दिनांक 5 जुलै 2021 रोजी कारखाना निरीक्षकाने कारखान्याचे मालक श्री. चेतन शाह यांना कारणे दाखवा नोटीसची बजावणी केली. मालकाने दिनांक 12 जुलै 2021 रोजी सदर कारणे दाखवा नोटीसचे उत्तर दिले. कारखाना निरीक्षकाने ठाणे येथील विद्वान मुख्य न्यायदंडाधिकारी समोर एस. सी. सी. क्रमांक 7738/ 2021 अन्वये फौजदारी तक्रार दाखल करून मालकाविरुद्ध खटला चालवला.

7. श्री इलियास अब्दुल जब्बार सय्यद यांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर, कंपनीने दिनांक 28 ऑक्टोबर 2021 रोजी मृतकाच्या वडिलाला सानुग्रह रक्कम रु. 1,00,000/- प्रदान केली. त्याच्या सेवेची कायदेशीर देय रक्कमही प्रदान करण्यात आली.

8. दिनांक 2 फेब्रुवारी 2022 रोजी, प्रस्तुत अर्जदार जो कारखान्याचा व्यवस्थापक आहे, त्याच्याविरुद्ध प्रथम खबरी अहवाल क्र. 0047/2022 (एफ. आय. आर.) दाखल करण्यात आला. तपास अधिकाऱ्याने दिनांक 31 मार्च 2022 रोजी आरोपपत्र दाखल केले. दिनांक 30 ऑगस्ट 2021 रोजी, एससीसी क्र. 7738/2021 मध्ये निशाणी 'एफ' च्या खाली दिलेल्या आदेशानुसार, विद्वान मुख्य न्याय दंडाधिकाऱ्यांनी श्री चेतन शाह यांनी केलेल्या गुन्ह्याची कबुली नोंदवली आणि श्री शाह यांनी स्वेच्छेने गुन्हा कबूल केला आहे हे लक्षात आल्यानंतर, त्यांना सीआरपीसी च्या कलम 252 अंतर्गत दोषी ठरवण्यात आले आणि कारखाना नियमावली, 1963 च्या नियम 73-एफ (ए) आणि (बी) आणि कारखाना अधिनियम, 1948 ('कारखाना अधिनियम') च्या कलम 92 अंतर्गत दंडनीय असलेल्या सदर गुन्ह्यासाठी त्याला रु. 50,000/-चे द्रव्यदंड भरण्याची शिक्षा ठोठावण्यात आली.

9. या कार्यवाहीत अर्जदाराने मांडलेली कारणे पुढीलप्रमाणे सारांशित केली जाऊ शकतात :-

(ए) एफ. आय. आर. दाखल करणे अयोग्य आणि चुकीचे आहे;

(बी) एससीसी क्र. 7738/2021 मधील सक्षम न्यायालयाच्या निर्णयाच्या दृष्टीने भारतीय दंड संहिता, 1860 (आय. पी. सी.) च्या कलम 304 ए अंतर्गत पोलीस स्टेशन- भाईंदर द्वारे एफ. आय. आर. दाखल करणे अनावश्यक आणि अनाहूत आहे;

(सी) कारखाना नियमावली, 1963 च्या कलम 73-एफ (ए) आणि (बी) सह कारखाना अधिनियमाच्या कलम 92 अंतर्गत मालकावर खटला चालवण्यात आला असल्यामुळे, अर्जदारावर त्याच गुन्ह्यासाठी खटला चालवला जाऊ शकत नाही, कारण ज्या तरतुदींनुसार मालकावर खटला चालवला गेला आहे त्या तरतुदी भारतीय दंड संहितेच्या कलम 304 ए वर अधिभावी ठरेल.

(डी) तपास अधिकाऱ्याने या घटनेच्या संदर्भात कारखाना निरीक्षकाकडून अहवाल मागवायला हवा होता आणि तो एक औद्योगिक अपघात असल्यामुळे अर्जदाराविरुद्ध आयपीसीच्या कलम 304 ए अंतर्गत खटला चालवला जाऊ शकत नाही.

(ई) अर्जदाराच्या प्रस्तावित खटल्याला भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 20 (2) चा फटका बसतो, कारण अर्जदाराविरुद्ध एफ. आय. आर. दाखल करणे हा दुसरा खटला असेल आणि ती त्याच गुन्ह्यासाठी शिक्षा ठरेल, ज्या गुन्ह्यासाठी कारखान्याच्या मालकावर आधीच खटला चालवला गेला आहे

(एफ) कारखाना अधिनियम आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांच्या तरतुदींखालील घटक हे आयपीसी च्या कलम 304 ए सारखेच आहेत.

(जी) कारखाना अधिनियम आणि आयपीसी च्या तरतुदी एकत्र जाऊ शकत नाहीत आणि विशेष कायदा सामान्य कायद्यावर वर्चस्व गाजवेल.

(एच) दिनांक 31 मे 2021 रोजी इलियासच्या मृत्यूनंतर पोलिस स्टेशन- विनोबा भावे नगरला अपघाताची माहिती देण्यात आली होती, तरीही तपास अधिकाऱ्याने दिनांक 2 फेब्रुवारी 2022 रोजी अर्जदाराविरुद्ध एफआयआर दाखल केला आहे.

(आय) एफ. आय. आर. दाखल करण्यास विलंब झाला आहे.

(के) तपास अधिकारी आयपीसी च्या कलम 304 ए अंतर्गत अर्जदाराविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्याच्या स्थितीत नसेल.

(एल) मृतकाला सेफ्टी बेल्ट देण्यात आला होता आणि तो तुटल्यामुळे आणि हेल्मेट मृतकापासून वेगळे झाल्यामुळे, मृतकाचा कारखान्याच्या छतावरून पडल्याने मृत्यू झाला.

(एम) कारखाना अधिनियमाच्या तरतुदींनुसार मालकावर खटला चालवल्यानंतर, व्यवस्थापकावर आयपीसीचे कलम 304 ए लागू करून खटला चालवला जाऊ शकत नाही.

(एन) सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, 1897 च्या कलम 26 चे विचार करता, एखाद्या व्यक्तीला एकाच गुन्ह्यासाठी दोनदा शिक्षा होऊ शकत नाही आणि मालकावर खटला चालवणे आणि आता अर्जदारावर खटला चालवणे हे एकाच घटनेतून घडले आहे.

10. अर्जदाराच्या विद्वान वकिलाने न्यायनिर्णयांवर विश्वास दर्शविले आहे :-

i) **मणिपूर प्रशासन, मणिपूर- विरुद्ध - थॉकचॉम बीरा सिंग [1] ;**

ii) **कुर्बान हुस्सेन मोहमदअल्ली रंगावाला -विरुद्ध - महाराष्ट्र राज्य [2];**

iii) **नीरज वर्मा -विरुद्ध - मध्य प्रदेश राज्य [3] ;**

iv) **अनंथा कुमार -विरुद्ध - कर्नाटक राज्य [4] ;**

v) **अजीत विक्रम बहादुर सिंग – विरुद्ध- महाराष्ट्र राज्य [5].**

11. विद्वान अतिरिक्त सरकारी वकिलांनी असे युक्तिवाद करून सदर अर्जाचा तीव्र विरोध केला की, कारखाना अधिनियम आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार अर्जदारावर कधीही खटला चालवला गेला नाही. सुरुवातीला, कारखाना अधिनियमाच्या कलम 92 चा विचार करून, अपघाताची तक्रार पोलिस ठाण्यात

---

1 1965 (1) सीआरआय एलजे 1202

2 (1965) एससीआर 622

3 (2016) 149 एफएलआर 784

4 2019 क्रि. एल.जे 3825

5 2024 एससीसी ऑनलाईन बॉम्बे 3607

करण्यात आली. कारखाना अधिनियमाच्या तरतुदींनुसार, विशेषकरून कारखाना चालवताना कारखान्याच्या परिसरात घडणाऱ्या कोणत्याही अपघाताच्या संदर्भात, कारखान्यातील सर्व कृताकृत आणि त्रूट्यासाठी तोच जबाबदार होता हे लक्षात घेऊन मालकावर खटला चालवण्यात आला.

12. तपासादरम्यान आणि विद्वान मुख्य न्यायदंडाधिकारी सीआरपीसी च्या कलम 252 आणि कारखाना अधिनियमाच्या तरतुदींतर्गत मालकाला दोषी ठरवण्यापूर्वी, तपासात असे उघड झाले की, सदरहू अर्जदाराने मृतकाला कारखान्याच्या छतावर चढून एस्बेस्टॉस शीट बसवण्यास अनधिकृतपणे निर्देशित केले होते. मृतक हा कारखान्याचा कर्मचारी होता आणि वेल्डर म्हणून काम करत होता. कारखान्याचे फाटलेले छप्पर दुरुस्त करण्यासाठी कोणत्याही विशिष्ट एजन्सीला बोलावले गेले नाही. मृतक एक प्रशिक्षित वेल्डर होता आणि कारखान्याच्या छतावर शीट बसवण्याशी त्याचा काहीही संबंध नव्हता, तरी व्यवस्थापकाने त्याला निर्देश दिल्यामुळे, त्याने त्याच्या आज्ञेचे पालन केले आणि तो छतावर चढला.

13. विद्वान अतिरिक्त सरकारी वकिलांनी पुढे सादर केले की, तपास अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार सुरक्षा उपायांचे पालन केले गेले नाही. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार, मृतकाला सेफ्टी बेल्ट देण्यात आला होता. जोरदार वाऱ्याने मृतक अस्थिर झाल्यामुळे पट्टा तुटला आणि तो कारखान्याच्या छतावरून जमिनीवर पडला. मृतकाच्या छाती

आणि पोटाला गंभीर जखमा झाल्याने हा मृत्यू झाला. तपासादरम्यान तपास अधिकाऱ्याच्या लक्षात आले की व्यवस्थापकाने प्रत्यक्षात निर्देश जारी केले होते, त्यामुळे एफआयआर नोंदवण्यात आला आहे.

14. अर्जदाराच्या विद्वान वकिलाने याचे खंडन करताना असे सादर केले आहे की, विद्वान मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर निवेदन देण्यात आले होते की, मृतकाला हेल्मेट सोबत सेफ्टी बेल्ट प्रदान करण्यात आला होता.

15. आम्ही संबंधित पक्षकारांच्या वरील निवेदनांचा विचार केला आहे. अर्जदाराविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे आणि आयपीसीचे कलम 304 ए लागू करण्यात आले आहे. कारखान्याच्या छतावरील सीमेंट शीटचे नुकसान झाल्याचे एफआयआर मध्ये म्हटले आहे. नैसर्गिक प्रकाश मिळावा या उद्देशाने छतावर वेगवेगळ्या ठिकाणी फायबर शीट्ष देखील बसवण्यात आल्या होत्या. हा कारखाना रेल्वे बोगीच्या चेसिसचे उत्पादन करत होता आणि आणि मृतकासह विविध कामगार या उत्पादन उपक्रमांवर त्यांचे काम करत होते. मृतक वेल्डर होता. तपासादरम्यान, अनेक सहकर्मचाऱ्यांनी तपास अधिकाऱ्याला जबानी दिली होती की, अर्जदार/व्यवस्थापकाने कामगारांना छतावरील तुटलेली शीट्ष दुरुस्त करता येतील की नाही याबद्दल विचारले होते. इलियास हा कामगारांपैकी एक होता, जो छतावर चढला होता. छतावर नवीन

शीट लावण्याचा प्रयत्न करत असताना तो छतावरून खाली पडला. लोखंडी प्लेट्स आणि मशीनी जमिनीवर पडलेल्या होत्या आणि त्याच्याने मृतकाला जखमा झाल्या.

16. तपासादरम्यान उघडकीस आलेल्या सदर पैलूंचा विचार करून, तपास अधिकाऱ्याने असे मत मांडले की, इलियासचा मृत्यू, ज्या कारखान्यासाठी त्याची नियुक्ती करण्यात आली होती, त्या कारखान्यात सामान्य कर्तव्ये पार पाडत असताना घडलेला प्रसंग नव्हता. ज्या कामासाठी त्याला प्रशिक्षित केले गेले नव्हते किंवा ज्या कामासाठी त्याला नियुक्त केले गेले नव्हते अशा कामासाठी त्याला छतावर पाठवण्यात आले होते, त्यामुळे तपास अधिकाऱ्याने असे मत मांडले की व्यवस्थापकाच्या आदेशामुळेच मृतक हे काम करण्यासाठी छतावर गेला.

**दोन मुद्दे**

17. अर्जदार आणि विद्वान अतिरिक्त सरकारी वकिलांच्या निवेदनांचा विचार केल्यावर आम्हाला आढळले आहे की, या प्रकरणात दोन पैलू आहेत. **प्रथम,** कोणत्याही व्यक्तीवर एकाच गुन्ह्यासाठी एकापेक्षा जास्त वेळा खटला चालवला जाणार नाही किंवा शिक्षा केली जाणार नाही, या अर्जदाराच्या निवेदनाच्या दृष्टीने भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 20 (2) ची प्रयोज्यता आहे काय ? **दुसरे** म्हणजे, पोलीस ठाण्याला कळवण्यात आलेल्या घटनेचा तपास करताना अर्जदाराची भूमिका लक्षात आल्यानंतर तपास अधिकाऱ्याला त्याच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्याची परवानगी होती काय ?

## निष्कर्ष

18. **मणिपूर प्रशासन, मणिपूर** (उपरोल्लेखित) आणि **कुर्बान हुस्सेन मोहमदअल्ली रंगावाला** (उपरोल्लेखित) च्या प्रकरणात आरोपीला दोषी ठरवल्यानंतर हा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात पोहोचला होता. **मणिपूर प्रशासन, मणिपूर** (उपरोल्लेखित) च्या प्रकरणात असे मानले गेले की वादप्रश्न- प्रतिष्टंभाचा नियम दुबार धोक्याच्या प्रतिकथनासारखे नाही. सीआरपीसीचे कलम 403 वादप्रश्न- प्रतिष्टंभाच्या या नियमाच्या प्रयोज्यातेला प्रतिबंधित करत नाही. मणिपूरच्या न्यायालयीन आयुक्तांनी सत्र न्यायाधीशांनी दिलेला दोषसिद्धीचा आणि शिक्षा रद्द करण्याच्या निर्णयाचा विचार करताना, पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढण्यात आले होते :-

*" म्हणून हे स्पष्ट आहे की, फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम 403 वादप्रश्न- प्रतिष्टंभाच्या या नियमाच्या प्रयोज्यातेला प्रतिबंधित करत नाही. हा नियम ठोस तत्वांशी सुसंगत आहे आणि उच्च अधिकाऱ्यांनी त्याला पाठिंबा दिल्यामुळे आणि या न्यायालयाच्या निर्णयाद्वारे तो योग्य असल्याचे मान्य करण्यात आले आहे, त्यामुळे आम्हाला तो नाकारण्याचे कोणतेही कारण दिसत नाही. या न्यायालयाच्या निर्णयाआधीही हा नियम काही उच्च न्यायालयांनी लागू केला होता आणि उदाहरणादाखल आपण माणिकचंद आगरवाला-विरुद्ध-राज्य च्या प्रकरणात सी. जे. हॅरीसच्या निर्णयाचा संदर्भ घेऊ शकतो. निरोप घेण्यापूर्वी,*

*निरीक्षण करणे योग्य आहे असे आम्हाला वाटते. कधीकधी असा प्रश्न उपस्थित केला जातो की, एखाद्या आरोपीविरुद्धही वादप्रश्न- प्रतिष्टंभाचा तत्त्व लागू केला जाऊ शकतो काय, त्याच्या प्रयोज्यतेविरुद्ध युक्तीवाद असा आहे की, जोपर्यंत अभियोग पक्ष आरोपीवर खटला चालवणाऱ्या न्यायालयासमोर पुरावा सादर करून त्याचे समाधान करण्यासाठी असे सिद्ध करत नाही की आरोपी त्याच्यावर लादलेल्या गुन्ह्यात दोषी आहे, तोपर्यंत अभियोजन पक्ष यशस्वी होऊ शकत नाही. आम्ही या प्रश्नावर कोणतेही मत व्यक्त करणार नाही, कारण तो परीक्षणासाठी उद्भवत नाही.*

*आधी सांगितल्याप्रमाणे, जर प्रीतम सिंगच्या (') प्रकरणात योग्य निर्णय देण्यात आला, तर न्यायालयीन आयुक्तांचा निर्णय योग्य होता हे मान्य केले गेले.*

*त्यामुळे याचिका अयशस्वी ठरते आणि फेटाळली जाते.*

*याचिका फेटाळली ".*

वस्तुस्थितीनुसार, माननीय सर्वोच्च न्यायालयाने मणिपूर प्रशासनाने उत्तरवादीच्या निर्दोष मुक्ततेविरुद्ध दाखल केलेली याचिका फेटाळली.

19. **कुर्बान हुस्सेन मोहमदअल्ली रंगावाला** (उपरोल्लेखित) च्या प्रकरणात कारखाना व्यवस्थापकावर आयपीसी च्या कलम 304 ए अंतर्गत दंडनीय गुन्ह्यासाठी खटला चालवण्यात आला. आरोपींच्या बेपर्वाईने आणि निष्काळजीपणामुळे सात कामगारांचा

मृत्यू झाल्याचा आरोपाबद्दल न्यायचौकशी न्यायालयासमोर खटला चालवण्यात आला, ज्याने अपीलकर्त्याला दोषी ठरवले. मुंबई उच्च न्यायालयानेही या दोषसिद्धीला दुजोरा दिला.

20. गुणवत्तेनुसार, माननीय सर्वोच्च न्यायालयाने असा निष्कर्ष काढला की मृत्यू हा आरोपींच्या उतावीळपणाचा किंवा निष्काळजीपणाचा थेट परिणाम असला पाहिजे आणि हे कृत्य दुसऱ्याच्या निष्काळजीपणाच्या हस्तक्षेपाशिवाय 'कार्यक्षम कारण' असले पाहिजे. कारखाना व्यवस्थापकाच्या वर्तनामुळे कारखाना परिसरात आग लागली नाही असा निष्कर्ष काढण्यात आला. त्यामुळे कारखाना व्यवस्थापकाला आयपीसी च्या कलम 304 ए अंतर्गत दंडनीय गुन्ह्यातून मुक्त करण्यात आले, परंतु आयपीसी च्या कलम 285 अंतर्गत दंडनीय गुन्ह्यासाठी सहा महिन्यांच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

21. **नीरज वर्मा** (उपरोल्लेखित) आणि **अनंथा कुमार** (उपरोल्लेखित) च्या प्रकरणात विद्वान एकल न्यायाधीशांनी आणि **अजीत विक्रम बहादुर सिंग** (उपरोल्लेखित) च्या प्रकरणात या न्यायालयाच्या द्विसदस्यीय खंडपीठाने घेतलेला दृष्टिकोन, एकाच गुन्ह्यासाठी एखाद्या व्यक्तीवर दोनदा खटला चालवला जाऊ शकत नाही आणि त्याला शिक्षा होऊ शकत नाही हा दृष्टिकोन कायद्याला बळकटी देतो.

22. अर्जदाराचे विद्वान वकील आम्हाला हे पटवून देण्यास असमर्थ आहे की, मालकावर कारखाना अधिनियमाच्या कलम 92 अंतर्गत खटला चालवला गेल्यामुळे, प्रस्तुत अर्जदार हा कारखाना व्यवस्थापक जरी असला तरी त्याच्यावर खटला चालवण्यात आला आहे असे मानले जाते. सेफ्टी बेल्ट खराब झाला किंवा तुटला किंवा इलियासने हेल्मेट घातले होते आणि ते उडाले होते की नाही, हे न्यायचौकशी न्यायालयावर विचार करण्यासाठी सोडावे लागेल कारण ही कागदोपत्री आणि मौखिक पुराव्याची बाब असेल.

23. केवळ सीआरपीसी च्या कलम 482 अंतर्गत दाखल केलेले सदर अर्ज हाताळण्याच्या हेतूने आम्ही एफआयआर मधील मजकुराचा विचार केला आहे, जे असे सूचित करते की तपास अधिकाऱ्याच्या तपासादरम्यान आणि इतर सहकाऱ्यांच्या विधानावरून लक्षात आले की मृतक छतावर चढला होता, कारण व्यवस्थापकच होता ज्याने कामगारांना या समस्येचे निराकरण करण्यासाठी आवाहन केले होते. मृतकाला सदर काम करण्यासाठी नियुक्त करण्यात आले नव्हते. तो छतावर चढला नसता, जर व्यवस्थापकाने त्याला असे सूचित केले नसते की छप्पर मोडले आहे आणि दुरुस्तीचे काम हाती घ्यावे लागेल.

24. मालक या नात्याने, सह-संचालक, औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य, ठाणे यांनी कारखाना अधिनियमाच्या कलम 92 अंतर्गत मालकावर खटला चालवणे योग्य मानले,

जे कायद्याद्वारे सुनिश्चित केलेल्या तत्त्वाशी सुसंगत आहे. अशा प्रत्येक अपघाताची चौकशी करावी लागते आणि औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य विभाग हा मुद्दा मालकावर खटला चालवण्यासाठी मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांकडे पाठवू शकतो. तपास सुरू असताना आणि मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर गुन्हा दाखल करण्यात आला असताना, तपास अधिकाऱ्याला आढळले की अर्जदाराच्या भूमिकेमुळे इलियासचा मृत्यू झाला असावा आणि आयपीसीचे कलम 304 ए लागू करण्यात आले. याचा अर्थ असा नाही की मालकावर खटला हा अर्जदार/कारखाना व्यवस्थापकावर खटला मानला जातो. अशा परिस्थितीत फौजदारी न्यायशास्त्रात एक कल्पनारम्य कल्पना लागू होणार नाही. फौजदारी कायद्यानुसार, अमुक व्यक्तीवर खटला चालवला जाऊ शकतो आणि खटल्याच्या सुनावणीनंतर त्याला दोषी ठरवले जाऊ शकते. जर हे लक्षात आले की आयपीसी अंतर्गत, अमुक व्यक्तीने एखादे कृत्य केले आहे आणि तो व्यक्ती मालक नाही जेणेकरून त्याच्याविरुद्ध कारखाना अधिनियमाच्या कलम 92 अंतर्गत खटला चालविला जाईल, तर तपास अधिकाऱ्याला गुन्हा दाखल केल्याबद्दल चुकीचे ठरवले जाऊ शकते, असे आम्हाला वाटत नाही.

25. अशा प्रकारे हे स्पष्ट आहे की, सदरहू अर्जदारावर यापूर्वी कधीही खटला चालवला गेला नव्हता आणि त्याच्याविरुद्ध एफआयआर दाखल करणे म्हणजे त्याच्यावर दोनदा

खटला चालविणे असे होत नाही. वरील बाबी लक्षात घेता, एफआयआर रद्द करण्यासाठीचा हा अर्ज विचारात घेतला जाऊ शकतो असे आम्हाला वाटत नाही.

27. 'कोणत्याही गुणवत्तेशिवाय' **हा फौजदारी अर्ज फेटाळला जातो.**

**(न्यायमूर्ति राजेश एस. पाटील)** **(न्यायमूर्ति रवींद्र व्ही. घुगे)**

<u>अस्वीकरण</u>

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".

XXXXX